# विद्यावार्ता

Peer Reviewed International Refereed Research Journal


पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित,

## श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

ता. फुलंब्री जि. औरंगाबाद (महाराष्ट्र)

मराठी विभागाच्या वतीने

( श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय रौप्य महोत्सवी वर्ष, भारतीय स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवीवर्ष, संत ज्ञानेश्वर माऊली यांचे ७२५ वे संजीवन समाधी वर्ष व श्री चक्रधर स्वामी यांच्या अष्ट जन्मशताब्दी वर्षानिमित्त)

# सद्यस्थितीत संत साहित्याची प्रासंगिकता

दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद


संपादक

प्रा.डॉ. संजीवकुमार सुर्यकांत पांचाळ

सहसंपादक

प्रा.डॉ. राजश्री पंढरीनाथ पवार



Scanned by CamScanner

47

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या कृषीविषयक विचारांची कालातितता

प्रा. डॉ. दादाराव गुंडरे
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख,
शिक्षणमहर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब,
जि. उस्मानाबाद

**********

**प्रास्ताविक :**

महाराष्ट्र ही संत–महंतांची, शूरवीरांची, समाजसुधारकांची, ज्ञानोपासकांची, विचारवंतांची भूमी म्हणून ओळखली जाते. महाराष्ट्र हे एक पुरोगामी, प्रागतिक राज्य म्हणून ओळखले जाते. येथे होऊन गेलेल्या प्रबोधनकारामुळे तसेच संत चळवळींमुळे तशी ओळख आहे. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत चोखामेळा, संत तुकाराम, अशा महान संतांची परंपरा लाभलेल्या महाराष्ट्रात अलीकडच्या काळात १९०९ मध्ये अमरावती जिल्ह्यातील 'यावली' या गावी संत तुकडोजी महाराजांच्या रूपाने महान विभूती जन्मास आली. संतांच्या उज्ज्वल परंपरेत संत गाडगेबाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे वेगळे ठरतात. एक क्रांतीकारी देशभक्त, साहित्यिक, सर्वधर्मसमन्वयक, समाजशिक्षक, कीर्तनकार, प्रवचनकार, आध्यात्मिक जाणकार, विचारवंत, शिक्षणतज्ज्ञ असे एकूण बहुआयामी व्यक्तीमत्व राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे आहे.

मराठी साहित्य परंपरेतील 'संत साहित्य' हे वैशिष्ट्यपूर्ण राहिले आहे. जे सन्मार्ग व मानवतेची शिकवण देते. 'जनसेवा हीच ईश्वरसेवा' मानून संबंध आयुष्यभर कृतिशील कार्य केले. त्यांनी भजन, ओवी, कवाली, प्रवचन व ग्रंथलेखनाच्या माध्यमातून नवभारत निर्मितीत मौलिक योगदान दिले. आपल्या खंजिरी भजनाने जनलोकात चैतन्याचा झरा निर्माण करणाऱ्या तुकडोजींनी आपल्या सर्व चिंतनाचे बळ एकवटणारा 'ग्रामगीता' नावाचा ग्रंथ १९५५ मध्ये रचला. त्यांच्या आजपर्यंतच्या समाजनिरीक्षण, चिंतन मननाची परिणती म्हणजे हा ग्रंथ होय. पुढे ही ग्रामगीता केवळ गावापुरती सीमित न राहता अवघे विश्वच कवेत घेतले. अध्यात्म व विज्ञान यांची उत्तम सांगड घातली. त्यांच्या सर्व ग्रंथांचा कळस 'ग्रामगीता' होय. एकूण ४१ अध्याय, ८ पंचके, ४६७५ ओव्यांचा ग्रंथ असून, त्यातून ग्रामीण जीवनाशी निगडित अर्थात व्यक्ती समाज, राष्ट्र विकासाचा मूलमंत्र देणारे आरोग्य, अंधश्रद्धा निर्मूलन वैज्ञानिक दृष्टिकोन, शिक्षण, व्यसन, राष्ट्रभक्ती, धर्म, श्रमप्रतिष्ठा, कुटुंब, सण–उत्सव, संघटन, स्वच्छता, नशामुक्ती मानव मूल्ये, तसेच शेती व शेतकरी यासारख्या विषयांवर मौलिक विचार दिले. 'ग्रामगीता' व लोकाभिमुख कार्याच्या माध्यमातून आदर्श वस्तुपाठ दिला. त्यांच्या अंतर्गत असणारी विकासाची तळमळ, मनात घर करून असणाऱ्या विकासाचे प्रारूप वाणीसह, लेखणी व कृतीतून साकार झाले, जे वास्तवात येणे ही काळाची गरज आहे. प्रस्तुत शोधनिबंधातून म्हणून राष्ट्राच्या विकासाचा मूलाधार असणारी कृषिव्यवस्था अर्थात शेती व शेतकरी यांचा जो खोलवर जाऊन विधायक विचार केला, त्यास मूर्त रूप देणे सध्या गरजेचे आहे. त्यांच्या कृषीविषयक जीवनकार्याची प्रासंगिकता ही कालातीत असल्याचे दाखवणे हा उद्देश आहे.

'ग्राम', 'खेडे' हाच त्यांच्या विचाराच्या व चिंतनाचा केंद्रबिंदू होता. भारत देश हा कृषिप्रधान देश असून तोच देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा, मूलाधार आहे. बहुसंख्य ग्रामनिवासी लोकांच्या व्यवसाय शेती आहे. कृषिप्रधान देशातील खेड्याचा शेती व शेतकरी हाच आत्मा आहे. यांचा विकास झाला तरच देशाचा विकास होईल ही विचारसरणी होती. ग्रामशेती, ग्रामकल्याण हा केंद्रबिंदू मानून अनेक उपाययोजना सुचविल्या, अमानत ही आपल्या महात्मा गांधीजींच्या 'खेड्याकडे चला' या आवाहनास प्रतिसाद देणारी एक पिढीच उदयास आली. त्यामध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा आवर्जून उल्लेख करावा लागतो. गांधीजींच्या 'ग्रामराज्य' या संकल्पनेचा कृषिप्रधान संस्कृतीचा बारकाईने अभ्यास करून ग्रामोन्नतीतून देशोन्नतीचा कृती कार्यक्रमच दिला. शेती व शेतकऱ्यासंबंधी



Scanned by CamScanner

मांडलेल्या विचार व कार्यातून त्यांचे द्रष्टेपण लक्षात येते ते पुढीलप्रमाणे.

कृषिप्रधान भारत देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असणारा, जगाचा पोशिंदा असणाऱ्या शेतकऱ्याचे चित्र 'ग्रामगीता' या ग्रंथाच्या अर्पणपत्रिकेच्या वरच्या भागावर काढलेले दिसते. या पत्रिकेच्या प्रारंभी कष्टकरी शेतकऱ्याबाबत त्यांनी म्हटले आहे.

सर्व ग्रामवासी सुखी करावे। अन्न–वस्त्र–पात्रादि द्यावे।।
परि स्वत: दु:खची भोगावे। भूषण तुझे ग्रामनाथा।१।।

अशा शब्दातून पहिल्या ओवीतच शेतकऱ्याविषयीचा समर्पणभाव प्रकट करतात. हा भाव किती थोर आहे. अन्न, वस्त्र, निवारा हा कृषकाचा प्रसाद आहे. तो जगाचा पोशिंदा, पालनकर्ता आहे. सर्वजणसुखा समाधानाने जगण्यासाठी स्वत: कष्ट, दु:ख सहन करतो परसुखाने सुखावण्यात भूषण मानतो. त्याची भूमिका आई, वृक्षाप्रमाणे दिसते. शेतकऱ्यास 'ग्रामनाथा' संबोधून त्यास सौख्य लाभावे या हेतूने ग्रामगीतेचे लेखन केले. अशा शेतकऱ्याच्या श्रमास प्रतिष्ठा मिळावी त्यास सन्मानाने जगता यावे, त्याची प्रगती व्हावी, आनंद लाभावा ही तळमळ, अपेक्षा आहे. जगाचा पोशिंदा असणारा शेतकरी आज आत्महत्या करताना दिसतो आहे. शेतकरी सुखी तर भारत देश सुखी. जेव्हा शेतकरी सुखी होईल तो दिवस आनंदाचा असे मानतात. शेतकऱ्याच्या परिस्थितीविषयी, त्यांच्या श्रमास प्रतिष्ठा मिळावी या संबंधी ते म्हणतात,

तुझ्या श्रमास प्रतिष्ठा मिळो। सगळ्यांचे लक्ष तुजकडे वळो।।
मानवतेचे तेज झळझळो। विश्वमाजी या योग।।

सर्व जगाचे लक्ष त्याच्याकडे जावे, प्रगती व्हावी, सुख मिळावे ही अपेक्षा आहे. यास प्रतिष्ठा लाभली तरच देश आरोग्यसंपन्न होईल, आर्थिकदृष्टया संपन्न होईल असे वाटते. ग्रामदेवतेच्या श्रमाची कदर व्हावी त्याचे मूल्य जपणारा माणूस जागृत व्हावा त्याचे श्रमास प्रतिष्ठा देणे म्हणजे त्याचे पूजन होय. श्रम पुजनीय झालेली ती व्यक्ती, कुटुंब, गाव, तो देह पुजनीय ठरतो. श्रमिक घाम गाळून इतरांचे महाल बांधतो व स्वत: झोपडीत राहतो. त्याच्या शोषणाचीही कारणे सांगतात. शेतकरी हा भोळा शंकर आहे, तो साधा, विश्वासू, शुध्द–हृदयाचा खरा भागीरथ आहे. अशा उपमाही देतात. हे भूमिपूजनाचे, शेतकऱ्याचे श्रेष्ठत्व लक्षात घेऊन त्यांनी आपली 'ग्रामगीता' या ग्रामनाथास अर्पण केली.

म्हणोनी तुजची करितो अर्पण तू विश्वाचे अधिष्ठान।।
तुझेची व्हावे आधी उत्थान। विश्वमाजी म्हणोनिया।।

खेड्यातील माणूस अंतर्बाह्य बदलला जावा यासाठीचा सूत्रबध्द आराखडा तर दिलाच, पण हा ग्रंथ ग्रामनाथास अर्पण करून अनेकांचे लक्ष वेधले. 'ग्रामगीता' सारखा ग्रंथ शेतकऱ्यास अर्पण करावा एवढा शेतकरी मोठा आहे का? या प्रश्नाचे उत्तर देताना ते म्हणतात तुम्हा सर्वांना वाटते पण एक लक्षात असू द्या की, हा शेतकरी फार मोठा आहे, थोर आहे, सर्वांचा पोशिंदा आहे, जगाचा आधारस्तंभ आहे. शेतकऱ्याचे उपकार फार आहेत. माझे गुरु असो, आई असो, गांधीजी असो की कोणीही असो. हे सर्व जगतात त्या एका शेतकऱ्याच्या अन्नावर, त्याचे श्रमाचरल्याच्या घामावर, त्याचे रक्तावर. यापुढे जाऊन ते म्हणतात, शेतकरी हा चैतन्याचा चिरंजीव, शिवाचा शिशु आहे, शक्तीचा वैभव आहे. अमृताचा पुत्र आहे, मानवतेचा प्राण आहे चैतन्यच संपले तर ही सर्व सृष्टीच मृतवत् दिसेल. जगातील जिवंतपण हे शेतकऱ्याचे स्वरूप आहे. दर्शन आहे.

एकूणच ग्राम व शेती श्रम व शेतकरी यांचे महत्व सर्वत्र विशद केले आहे. केवळ शेतकऱ्याच्या दयनीय स्थितीविषयी, त्याच्या कारणाविषयी माहिती देऊन थांबत नाहीत, ते प्रभावी उपाययोजना सांगतात. शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी लोकांचे राज्य निर्माण व्हावे, त्यांना प्रतिष्ठा लाभावी यासाठी ग्रामगीतेचे लेखन केले. आर्थिक व सामाजिक समता ग्रामराज्यात निर्माण होण्यासाठीची श्रमबध्द योजना देणे. ग्रामगीता व लोकभिमुख कार्यातून स्वप्न पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. ग्रामनिर्माण पंचकातील शेवटचे पंचक म्हणजे 'गोवंश–सुधार', त्यांना शेतीसाठी गोवंश खूप महत्त्वाचा वाटतो. मोठ्या प्रमाणात गोपालन केल्याने दूधदुभते होते. त्यामुळे शरीर सशक्त व निरोगी होते गोधन पशुधन, भूमी हे शेतीचे आधारभूत घटक आहेत. या नवनिर्मितीच्या केंद्रातून शेतकऱ्याची उन्नती अवलंबून



Scanned by CamScanner

आहे. यासंबंधी तुकडोजी महाराज म्हणतात.

भारत हा कृषिप्रधान देश। शेतीमध्ये हवा गोवंश।
गोरसाइतुका नसे तत्वांश। अन्यत्र शुध्द।।

गायीपासून, शेतीसाठी लागणारे बैल, खत सुदृढ आरोग्यासाठी दुधदुभते मिळते. याची जाणीव करून देतात. शेतकरी जीवनात पाळीव पशुंचे महत्त्व विशद केले. भारत हा गोपाळांचा देश असून त्यांची पुजा केली जाते. शेती करण्यासाठीची बैलप्राप्ती, शेणखत, सुदृढ आरोग्यासाठी दूध तसा तिहेरी फायदा गोपालनातून होतो. त्यामुळे तुकडोजी महाराज म्हणतात,

म्हणोनि गायिगुरा शोधन। ऐसे सत्य नामाभिधान।
सुख होता भारत संपूर्ण। गोवंश सुखवोनिया।।

त्यामुळे गोधन वाढविण्याचा सल्ला देता. 'गोधन म्हणजे स्वरक्षण' विकास अशा शब्दातून महत्व नमूद करतात. तसेच गायीच्या दुधाचे अनेक औषधी सुधारता येते. मुख्यत: ग्रामीण अर्थव्यवस्था, भारतीय अर्थव्यवस्था वाढवण्यास मोठी मदत होते.

दिवसरात्र मेहनत करून शेतकरी शेतीची मशागत करतो, धान्य पिकवितो, उत्पादन घेतो. खर्चाच्या तुलनेने शेतीमालास भाव मिळत नाही. मायत्याच्या कच्च्या मालाचे पक्क्या मालात रूपांतर झाले नि तो जेव्हा बाजारात घ्यावयास जातो तेव्हा तिप्पट—चौपट रक्कम मोजावी लागते. अशावेळी तो कसा जगणार? कसे सुख लाभणार? हे वास्तव मांडताना ते म्हणतात,

कच्चा माल मातीच्या भावे। पक्का होता चौपटीने घ्यावे।।
मग ग्रामजन कैसे सुखी व्हावे। पिकवोनिहीते उपाशी।।

अशा शब्दातून शेतकऱ्याचे होणारे शोषण पटवून देतात. विविध पिके घेऊन त्यास उपाशीपोटी रहावे लागते. अशा दैन्यावस्थेत जीवन कंठावे लागते हे वास्तव मांडले. तसेच गावातील लघुउद्योग मोडकळीस आल्याने खेड्यातील माणसे शहरात आली. कच्चा माल शहरात आणि त्यामुळे खेड्यात अवकळा आल्याचे सांगतात.

यातून बाहेर पडण्यासाठी तुकडोजी महाराज शेतमालाचे भाव शेतकऱ्याच्या सल्ल्याने व्हावेत तसेच दलाल, व्यापारी व सरकारने किती नफा घ्यावा हेही ठरवावे. जमिनीस लागणाऱ्या सर्व साधन सामग्रीची किंमत देखील धान्याच्या भावावरून आभारली जावी असे सांगतात. दलाल, व्यापारी, सरकारच्या मनमानीस शेतकरी पुरता वैतागला आहे. प्रत्येक गावात शेतमालाची विक्री व्हावी. त्याच्या उत्पादन वाढीस प्रेरणा द्यावी. या भावनेतून अधिकारी व शेतकरी एकरूप झाले तरच शेतकऱ्यांच्या जीवनमानात फरक पडेल. शेतकऱ्यांनी शेतीपूरक उद्योग उभारावेत. त्यामुळे शेती, कुटुंब गाव आर्थिक संकटात ये नाही. हे पटवून देताना म्हणतात,

प्रत्येक घरी जोडधंदा। सर्व स्त्री—पुरूष यांची छंदा।
दूर करावया आपदा। जीवनाच्या लागावे।।

यामुळे बेगारी कमी होईल व उत्पादन ही वाढेल, शेतीमालावर प्रक्रिया गावात करावी. त्याच्या विक्रीचेही नियोजन करावे त्यामुळे बऱ्यापैकी उत्पन्न वाढेल. निसर्गाच्या लहरीपणावर शेती अवलंबून आहे. हे नुकसान भरून काढण्यासाठी शेतीपूरक उद्योगासारख्या उपाययोजना सांगितल्या. महागडी खते, बी बियाणे खरेदी करण्यापेक्षा गावातच सेंद्रिय खतनिर्मिती, बीजोत्पादन करावे ही धारणा प्रकट केली. आर्थिक उन्नतीसाठी वचनांचाही सल्ला देतात. जी वचन भविष्यकालीन संकटावर मात करण्यासाठी उद्योग व रोजगार निर्मितीसाठी उपयोगी पडते खेड्यातील माणसास शेतीशिक्षण गरजेचे आहे. ज्यात श्रम व स्वावलंबनाचा समावेश होतो. शेती, उद्योग, कला आत्मसात करून स्वावलंबी व्हावे. शेती व शिक्षणाची फारकत होता कामा नये ते म्हणतात,

उत्तम शिक्षित सामर्थ्यवान। नोकरीसाठी फिरती वणवण।।
उद्योगधंदे वा शेती काढून। होईल उन्नती गावाची।।

प्रचलित शिक्षण पध्दतीत कृषी शिक्षणाचा अंतर्भाव हवा. तसेच सुशिक्षित बेरोजगार ही संकल्पनाच त्यांना मान्य नाही. आपल्यातील दुबळेपण निघून जावे. जीवन सुंदरपणे जगता येणे यासाठी शिक्षण असते. त्यामुळे शेतीशिक्षणासोबत त्यास आपल्या श्रमाची व नवतेन ज्ञानाची जोड देऊन जीवन यशस्वी करण्याचा आदर्श घेऊन देतात. रिकामे हात व शिक्षण यांची सांगड घालत आली की महान कार्य होते. समन्वयातून स्वावलंबन अर्थात सहकारी किंवा सामुदायिक शेतीचा पुरस्कार केली. आज होणारे शेतीविभाजन तुकडीकरण करून शेतीचा आकार कमी होत गेल्याने शेती परवडत

Scanned by CamScanner

नाही. त्यामुळे हा प्रयोग अव्यवहार्य असून विकास साधण्याचे आवाहन केले. आळस झटकून एकमेकांसोबत सहकार्य वृत्तीने काम केल्यास विकास साधता येतो. विविध उद्योग गृहउद्योगासाठी घरे कारखाने यांच्या उभारणीमुळे जमिनीचे क्षेत्रफळ कमी होत चालले आहे. दुसरीकडे लोकसंख्या वाढत आहे. तेव्हा अन्नधान्याची व्यवस्था करावी यासाठी नदी, तलाव, विहिरी यांच्या माध्यमातून जलसिंचन सुविधांची निर्मिती करणे अत्यावश्यक असल्याचे सांगितले.

केवळ निसर्ग, व्यवस्था, सावकार, यांच्यामुळे आपल्याकडील शेती व शेतकऱ्यांच्या अधोगतीस कारणीभूत ठरत नसून स्वतः शेतकरी देखील काहीअंशी या अधोगतीस जबाबदार ठरतो. हा निर्देश करताना ते म्हणतात,

कृषकांची सर्व सुटली। उद्योगाची भावना बाटली।
काम करीत भुकेला धणी। मशागत नसता जमिनीची॥

व्यसनाधिनता, कर्मकांड, आपापसातील भांडणे, आधुनिक जीवनशैली, चंगळवाद यासारखी स्वनिर्मित कारणेही त्यांच्या अधोगतीस कारणीभूत ठरत असल्याचे निदर्शनास आणून देतात.

शेतकऱ्यांनी आळस झटकून देशाच्या आर्थिक वाढीत सेवा करण्याचा सल्ला देतात. आपल्या पुरुषार्थाने शेतीची मशागत केल्यास भरघोस प्रसन्नता निर्माण करील तोच खरा शेतकरी म्हणून ओळखला असेही मानतात. 'श्रम' हा कृषीविकासाचा मूलाधार असून त्या श्रमाचा, कष्टाचा गौरव करतात. सत्यशोधक, भूमिहीन, शेतमजूर, बलुतेदार, अलुतेदार, शेती करण्यासाठी मदत करणाऱ्या सर्व घटकांचा बारकाईने विचार करतात. त्यांना नवी दिशा दिली. म्हणून विनोबा भावेंनी चालवलेल्या 'भूदान चळवळीत' सहभाग घेतला. 'कसेल त्याची जमीन' तत्त्वाचा पुरस्कार केला. एकूणच स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील शेतकऱ्यांच्या शेतीचे आणि त्यांच्या जीवनाचा सूक्ष्म अभ्यास तुकडोजी महाराजांनी केला. अगदी कृषीसंस्कृतीशी निगडित सण–उत्सवाचाही विचार केला. यानिमित्ताने शेती अवजारे, बैलांचे प्रदर्शन भरवून उत्तम बैल आल्यास बक्षिसे देऊन कौतुक करण्याचा विचार मांडला. अखिल विश्वाचा विचार करीत असताना आमच्याबरोबर पसरलेल्या सात लाख खेड्यांचा प्रश्न आधी विचारात घेणे हे आपले सर्वप्रथम कर्तव्य ठरत असल्याचे मत नोंदवतात. खेड्यातील प्रत्येकास स्वराज्य व सुराज्याचा उपभोग घेता यावा येथे प्रत्येकास सुखी जीवनाचा लाभ मिळावा या भावनेतून कृती–उक्तीचा मार्ग दाखवतात.

**निष्कर्ष :**

महाराष्ट्राच्या उज्ज्वल परंपरेतील एक थोर समाज–सुधारक, संतमालिकेतील एक थोर संत, क्रांतिदर्शी साहित्यिक म्हणून वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व सुप्रसिद्ध आहे. ते स्वतंत्र बाण्याचे समाजचिंतक व समाजसुधारक होते. महात्मा गांधीजींच्या खेड्याकडे चला या आवाहनास प्रतिसाद देऊन ग्रामोद्धारास कार्यरत झाले. ग्रामोन्नतीचा, राष्ट्रउन्नतीचा मार्ग ठरावा अशी ग्रामगीता नावाची अक्षर वाङ्मय निर्मिती केली. तसेच लोकशिक्षक म्हणून समाजाशी सुसंवाद साधून नवभारत निर्मितीत मोठे योगदान दिले. ग्रामगीता व लोकाभिमुख कार्यातून आपले स्वप्न पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. कृषिप्रधान भारत देशाचा सजा, आत्मा, मूलाधार असणाऱ्या ग्रामनाथास अर्थात शेतक–दास आपला 'ग्रामगीता' हा ग्रंथ अर्पण करून त्यांची शेती व शेतकरी यांच्या ठायी असणारी नितांत निष्ठा, श्रमनिष्ठा प्रतीत होते. विविध विषयांसोबत तुकडोजी शेती व शेतक–ग्रामसंबंधी लिहून येते. त्यांना वैभव, बलुतेदार, अन्नदाता, शेतकरी तसेच शेतमजूर, कष्टकरी यांना या जगात प्रतिष्ठा मिळावी, सुखाने जीवन जगता यावे ही अपेक्षा, तळमळ प्रकट होताना दिसते. स्वराज्याचे व सुराज्याचे यथोचित भान ठेवून ग्रामोन्नतीसाठी तळमळणारे खरेखुरे राष्ट्रसंत होते. आपले ज्ञान, विचार लोकांपुढे मांडले. ग्रामजीवनाच्या पुनर्रचनेचा प्रपंच तपासिलात लिहून खोलवर केला शेती व शेतकऱ्यांच्या सद्यःस्थिती विषयी, अधोगतीच्या कारणाविषयी व उपायोजनांचा कृती आराखडा त्यांनी दिला.

भारतातील शेतकरी, कष्टकरी सुखी तर सुखी, ग्रामोद्धार हाच राष्ट्रोद्धार हा मूलमंत्र दिला. अधिकारी, व्यापारी, सरकारने राष्ट्र उन्नतीसाठी राबणाऱ्या, देशसेवेसाठी कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांच्या समस्येस प्राधान्य द्यावे. त्यांच्या जीवनाचा विचार करावा. त्यांच्या कृषी विचारात, श्रमप्रतिष्ठा, शिक्षण, बचत, भांडवलनिर्मिती शेतीपूरक प्रक्रिया उद्योग, स्वावलंबन, स्वदेशी गोपालन अशा महत्त्वपूर्ण बाबींवर सविस्तर मार्गदर्शन केले. निसर्गशेती, सेंद्रिय शेती, सहकार शेतीचे पुरस्कर्ते होते. वैज्ञानिक दृष्टिकोन, कृषीविकास योजना, नवतंत्रज्ञानाचा वापर करण्याचा आग्रह धरला.

ग्रामीण माणसाच्या मानसिकतेचा सखोल अभ्यास

Scanned by CamScanner

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318

Vidyawarta®
Peer-Reviewed International Journal

Special Issue
Márcha 2022



करून त्यांची आंतरिक शक्ती वाढविण्यासाठीचा विचार दिला. त्यानुमान, गरजेनुरूप शेतकऱ्यांनी शेतीतंत्र अवगत करावे. शेतीशी संबंधित प्रत्येक बाबीचा डोळसपणे विचार करून कृती करावी. गावाकडून विश्वाकडे, गाव हा विश्वाचा नकाशा। गावावरून देशाची परीक्षा ही विचारसरणी होती. शेतकऱ्यांनी कर्मकांड, भंगळवाद, व्यसनाधिनता यासारख्या अधोगतीस नेणाऱ्या बाबींपासून दूर रहावे. आळस झटकून काम करावे. राष्ट्रसंतांच्या मनात शेतकऱ्यांविषयी असलेली आत्मीयता, तळमळ, जिव्हाळा यांचा प्रत्यय येतो. जनभाषेतून ग्रामसमस्या व उपायांची मांडणी प्रभावीपणे केली. आपले हृदय असणारी 'ग्रामगीता' शेतक-यास अर्पण करून शेतकऱ्यांचे अधिष्ठान पात्रता उत्पन्न विषद केली. खेड्यांचे महत्त्व, क्षमतेची ओळख देतात व असे केल्यास विकास होईल हा विश्वासही देतात. कृषीसंस्कृतीचे पुनरूज्जीवन करणे, ग्रामोध्दारातून राष्ट्रोध्दाराकडे, उत्थानाकडे नेणारी विचारधारा अमलात आणणे गरजेचे आहे. त्यामुळे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे शेती व शेतकऱ्या संबंधीचे अर्थात कृषीविषयक विचार कालातित असल्याचे सिध्द होते.

संदर्भग्रंथ सूची :

१. अशोक राणा : 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जीवन व कार्य', जिजाई प्रकाशन पुणे, ११ एप्रिल २००८

२. रा.मो. बेलुरकर, : 'ग्रामगीता आविष्कार', श्री माणिक प्रकाशन, वरखेडे जि. उमरावती, आवृत्ती ०२ नोव्हेंबर २००४

३. रा.मो. बेलुरकर, : 'ग्रामगीता अर्पण–पत्रिका भावार्थ', श्री माणिक प्रकाशन, श्रीक्षेत्र वरखेड जि. अमरावती, आवृत्ती ०६ डिसेंबर २००६

४. राम घोडे, : 'संत तुकाराम–संत तुकडोजी तौलनिक दर्शन', राजीव प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती १६८८

५. कडवे रघुनाथ, : 'राष्ट्रसंत तुकडोजी', संस्कार प्रकाशन, नागपूर–प्रथमावृत्ती २०००.

६. सुभाष सावरकर, : 'राष्ट्रसंत तुकडोजी जीवन व कार्य', मराठी जनसाहित्य परिषद अमरावती, आवृत्ती २००७

**48**

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज : ग्रामनिर्माण कला

प्रा. डॉ. शंकर किसनराव येडले
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख,
श्रीमती सुशीलादेवी देशमुख वरिष्ठ महाविद्यालय,
खाडगाव रोड लातूर

***********

**प्रास्ताविक :**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे पूर्ण नाव माणिक बंडोजी ठाकूर. विदर्भामध्ये मोझरी येथे गुरुदेव सेवामंडळ त्यांनी स्थापन केले. या मंडळाच्या ठिकठिकाणी विविध शाखा स्थापन करून त्यांनी केलेले लोकशिक्षणाचे, समाज सुधारणेचे, नवजागृतीचे बहुमोल असे व्यापक कार्य लक्षवेधी असे आहे. राष्ट्रभक्ती, देशप्रेम, सुखी, आनंदी, आदर्श समाजाचे सुंदर स्वप्न राष्ट्रसंतांनी पाहिले. ग्रामगीता हा आदर्श ग्रंथ पुन्हा पुन्हा वाचावा, समजून घेऊन तो इतरांना सांगावा, असा हा ग्रंथ भारतीय खेडी आणि गावोगावच्या ग्रामस्थांसाठी मार्गदर्शक असा आहे.

मराठी ग्रामीण साहित्यातील नामवंत समीक्षकांनी ग्रामगीता या ग्रंथाकडे म्हणावे तसे लक्ष का दिले नाही याचे आश्चर्य वाटते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या काव्यातून व्यापक, सर्वांगीण जीवनानुभवाचे मानवी जीवनासोबतच, निसर्ग, पर्यावरण, बौद्धिक विचार, विज्ञाननिष्ठ दृष्टी, आध्यात्मिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, राष्ट्रनिर्मितीचे बहुमोल अशा बहुआयामी विचाराचे दर्शन राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्यातून घडते. 'ग्रामगीता', 'अनुभवसागर भजनावली', 'सेवा स्वधर्म', 'राष्ट्रीय भजनावली' इत्यादी त्यांची बहुमोल ग्रंथसंपदा आहे. बहुसंख्य भारतीय समाज हा अजूनही खेड्यातूनच राहतो. तो गावाकडूनच रोजगार, उद्योग, शिक्षण, व्यापार आदी कारणामुळे शहरात आला व

Scanned by CamScanner